## NANDED WAGHALA CITY MUNICIPAL CORPORATION NANDED

**(शासन निर्णय दि.27.09.2018 नुसार)**

**Tender Notice No.:- NWCMC/(PWD) E-Tender/ 1564 /2025 Dt. 13/03/2025**

(तिसरी वेळ)

आयुक्त, नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका, नांदेड हे महानगरपालिकेच्या जुना मोंढा टॉवर येथे एक मास्टर क्लॉक व चार प्ले क्लॉकचा पुरवठा करणे कामासाठी कंत्राटदार, पुरवठादार व व्यापारी यांचेकडुन ई - दरपत्रक मागवित आहेत. या निविदा **https://mahatenders.gov.in** या संकेतस्थळा वरुन खरेदी करता येईल. निविदेच्या इतर अटी व शर्ती वरील संकेतस्थळावर नमुद केलेल्या आहेत

**ई-निविदा प्रक्रियेचे वेळापत्रक**

| अ.क्र. | तपशील | दिनांक | वेळ |
|---|---|---|---|
| 1 | ई-निविदा प्रकाशित करणे | 17/3/2025 | 15.00 |
| 2 | ई-निविदा डाऊनलोड करणे | 18/3/2025 | 15.00 |
| 3 | ई-निविदा भरणे | 18/3/2025 | 15.00 |
| 4 | ई-निविदा भरण्याचा अंतिम दिनांक व वेळ | 25/3/2025 | 15.00 |
| 5 | ई-निविदा उघडणे | 27/3/2025 | 15.00 |

| **अ.क्र.** | **कामाचे नांव** | **इसा-याची रक्कम रु.** | **को-या निविदेची किंमत** |
|---|---|---|---|
| 1 | नांदेड वाघाळा शहर महानगरपालिकेच्या जुना मोंढा टॉवर येथे एक मास्टर क्लॉक व चार प्ले क्लॉकचा पुरवठा करणे व बसविणे. (तिसरी वेळ) आकारमान अंदाजे 1.20 मी. | **15000/-** | **1000/-** |

**अटी व शर्ती**

1) निविदा धारकाने ई-निविदा पोर्टलवर "बीड लॉक" झाल्यानंतर सादर केलेल्या निविदा दरपत्रकाची "हार्ड कॉपी" 1 प्रतीत दि. 27/3/25 रोजी दुपारी 15.00 पर्यत कार्यकारी अभियंता, साबांवि, कक्ष क्र.106 नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका यांच्या कार्यालयात सादर करावे.

2) कंत्राटदाराने निविदा दरपत्रका सोबत खालीलप्रमाणे कागदपत्रे सादर करणे बंधनकारक आहे.

अ) निविदाधारकाने त्यांचा प्रमुख व्यवसाय, पत्ता, भ्रमणध्वनी क्रमांक, इत्यादी माहिती सादर करणे आवश्यक आहे.

आ) GST कार्यालयाचे नोंदणी प्रमाणपत्राची प्रत सादर करणे आवश्यक आहे.

ई) निविदा धारकाने मागील तीन वर्षाचा आयकर (Income Tax) भरणा केल्याचे प्रमाणपत्र सादर करणे आवश्यक आहे.

इ) निविदा धारकाने (EMD) भरणा केलेली कागदपत्रे स्कॅन/छायाकिंत प्रत दाखल करणे बंधनकारक आहे.

3) साहित्य पुरवठा करावयाचा कालावधी तीस (30) दिवस राहील. सदर कालावधी पर्यत साहीत्य पुरवठा न केल्यास सुरक्षा अनामत रक्कम जप्त करण्यास हरकत नसल्याचे प्रमाणपत्र सोबत जोडणे बंधनकारक राहील.

ऊ) निविदाधारकाने महाराष्ट्र दुकाने व आस्थापना (नोकरीचे व सेवाशर्तीचे विनियमन) नियम 2018 नुसार प्रमाणपत्र सादर करणे आवश्यक आहे.

ए) निविदाधारकाने सर्व कागदपत्रे खरी असल्याबाबतचे प्रतिज्ञापत्र 500/- रुपयाच्या स्टॅम्प पेपरवर लिहुन लिफाफा क्र. 1 मध्ये जोडणे बंधनकारक आहे.

ऐ) निविदा धारकाने पुरवठा करण्यात येणा-या कंपनीचा प्रोफाईल सादर करणे आवश्यक आहे.

ओ) निविदाधारकाने कंपनीचे मान्यता प्राप्त विक्रेता असल्याचे प्रमाणपत्र सोबत जोडणे आवश्यक आहे.

3) पात्र निविदा धारकाने करारनाम्याच्या वेळी रु.25,000/- अनामत रक्कम भरणा करणे आवश्यक आहे. सदर रक्कम देखभाल दुरुस्तीचा कालावधी पुर्ण (सात वर्षानंतर) झाल्यानंतर अदा करण्यात येईल.

4) निविदा धारकाने कोरी निविदेची किंमत (Tender Fee) व इसारा रक्कम (EMD) Online Payment Gateway व्दारे भरणा करावी.

5) कोणत्याही कारणाशिवाय एक किंवा सर्व निविदा नाकारण्याचे अधिकार आयुक्तांनी राखून ठेवलेले आहेत.

6) निविदाधारकाने सोबत जोडलेली सर्व कागदपत्रे निविदेचा भाग राहील.

7) काम पुर्ण करण्यासाठी आवश्यक सर्व सुविधा पात्र निविदाधारकास स्वतः उपलब्ध करुन घ्याव्या लागतील, याबाबत कुठलेही अतिरीक्त शुल्क/साहित्य/मनुष्यबळ इ. पुरविण्यात येणार नाही.

8) पुरवठा करावयाचे साहित्य उच्च दर्जाचे व नामांकित कंपनीचे असणे अनिवार्य असुन त्याबाबतची गॅरंटी दरपत्रकासोबत सादर करणे बंधनकारक राहील.

9) प्रस्तावित काम हे ऐतिहासीक वास्तुवर उभारावयाचे असुन किमान एक समकक्ष काम केल्याचा शासकीय/निमशासकीय/मान्यता प्राप्त संस्थेच्या अनुभवाचे प्रमाणपत्र सादर करणे आवश्यक आहे.

10) सदर कामाची किमान 7 वर्ष देखभाल दुरुस्ती करणे अनिवार्य असुन याबाबत लेखी स्वरुपात हमी देणे बंधनकारक राहील. सदर देखभाल दुरुस्तीबाबत वेगळ्याने शुल्क अदा केले जाणार नाही. दर सादर करताना 7 वर्ष देखभाल दुरुस्तीची बाब विचारात घेवुन दर सादर करावेत.

11) पुरवठा करण्यात येणा-या उपकरणांच्या रंगाची, साहीत्याची यंत्र सामुग्रीची तसेच सर्व सुट्या भागांच्या पुढील दहा वर्षाच्या कालावधीत उपलब्धतेबाबत लेखी हमी देणे पुरवठा धारकास बंधनकारक आहे.

12) निविदा दरपत्रकात नमुद साहित्यांचे परिमाण कमी/ जास्त करण्याचा अधिकार आयुक्त, मनपा यांनी राखुन ठेवला आहे.

13) साहित्यांचे दर सादर करताना Transportation, Loading, unloading , GST व इतर आवश्यक करासह दर भरणा करावा.

14) पुरवठा करण्यात येणा-या उपकरणांची देखभाल दुरुस्ती बाबतचे वेळापत्रक व पध्दत लिखीत स्वरुपात सादर करावे.

अतिरिक्त आयुक्त,
नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका,नांदेड

प्रति,

१. संगणक विभाग, नांवाशमनपा, नांदेड

२. जनसंपर्क विभाग, नांवाशमनपा, नांदेड

**प्रपत्र - १**

**दरपत्रक**

| अ.क्र. | विवरण | परिमाण | एकक | सादर करावयाचा देकार (देकार सर्व करासहीत व प्रत्यक्ष स्थळावर बसविणे तसेच निविदेतील अटी शर्थी नुसार) |
|---|---|---|---|---|
| 1 | नांदेड वाघाळा शहर महानगरपालिकेच्या जुना मोंढा टॉवर येथे एक मास्टर क्लॉक व चार प्ले क्लॉकचा पुरवठा करणे व बसविणे. आकारमान अंदाजे 1.20 मी. | 1 | नग | |
| | | TOTAL | | |

निविदा धारक
(स्टॅंप व स्वाक्षरी लेटर पॅडवर)

अतिरिक्त आयुक्त
नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका,नांदेड

## नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका, नांदेड

पत्ता:- वजिराबाद नांदेड ई- मेल पत्ता :- info@nwmcnanded.org दुरध्वनी (०२४६२) २३४४०४फॅक्स क्र. (०२४६२)

ई-निविदा सुचना जा.क्र.नांवाशमनपा/साबांवि/ 15163/२५,15164/२०२५, /२०२५ दि. 13/3/2025

आयुक्त, नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका, नांदेड महाराष्ट्र शासनाच्या सार्वजनिक बांधकाम खात्याकडुन योग्य त्या वर्गातील नोंदणीकृत कंत्राटदाराकडुन नमुद कामांकरीता नांवाशमनपा हद्दितील सी.सी. रस्ता /नाली करणे क्षेत्रात कार्यालयाच्या इमारतीचे बांधकाम करणे इत्यादी कामे ई-निविदा प्रणालीव्दारे (ऑनलाईन) निविदा मागवित आहेत. निविदा कागदपत्र संकेतस्थळावर https://mahatenders.gov.in येथुन डाऊनलोड करण्यात यावी. तसेच निविदा स्विकारण्याचा अथवा नाकारण्याचा अधिकार आयुक्त, नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका, नांदेड यांनी राखुन ठेवला आहे. अट असलेली निविदा स्विकारली जाणार नाही. (निविदा अटी/ शर्ती संकेतस्थळावर ई-निविदाची सर्व माहिती उपलब्ध आहे. सदर निविदा सुचने मध्ये काही बदल होत असल्यास वरील वेबसाईटवरती कळविण्यात येईल.

स्वा -
अति.आयुक्त,
नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका नांदेड

प्रति :
संपादक दैनिक ८X१२ चौ.से.मी./ दैनिक ८X१२ चौ.से.मी.
यांना देवून विनंती करण्यात येते की, सदरील निविदा सुचना आपल्या दिनांक. .०३.२०२५ च्या वृत्तपत्रात वर दिलेल्या आकारमानात जागेत प्रसिध्द करुन बिलाच्या २ प्रति शासनाच्या मान्यतेच्या प्रतीसह सादर करावे.

(मा.अति आ. यांची स्वाक्षरी असे)

अति.आयुक्त,
नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका नांदेड / करिता

① दै. पुढारी (राज्यस्तर)
② दै. गोदातीर
8x12 चौ. से. मी.
दि. 17/3/2025